# हृदयविकार केंद्र चिखली येथे सुरू

**पणजी**

हृदय विकारावर संपूर्ण सेवा देणाऱ्या व्हीआयव्हीयूए एसएम आरसी हार्ट सेंटरने गोव्यातील रुग्णांसाठी व्ही. एम. साळगावकर हॉस्पिटल, एसएम आरसी कँपस, चिखल गोवा- येथे फोन: ६६९१६००/६६९१६६६ येथे सेवा सुरू केली आहे. हे सेंटर सुरू केले आहे. व्हीआयव्हीयूएस एएमआरसी हार्ट सेंटर हृदय विकारग्रस्त रुग्णांसाठी वरदान लाभले आहे. अतिशय आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून येथे उपचार केले जातात. हे रुग्णालय ५० बेडचे असून २४ तास अतिदक्षता केंद्र सुरू असते. २०००मध्ये या ग्रुपने पहिले रुग्णालय सुरू केले.

गेल्या दोन वर्षापासून व्हायवस ग्रूपने मोबाइल लॅबोरेटरीद्वारे आठवड्याच्या शेवटी ग्रामीण भागामध्ये सेवा सुरू केली आहे. या ग्रुपने राजीव गांधी विश्व विद्यालयातर्फे मान्यता मिळवलेले दोन फ लोशीप प्रोग्रॅम्स सुरू केलेले आहेत. व्हायवसच्या केंद्राला अलिकडेच इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातर्फे मान्यता मिळालेली असून तिथे औषधशास्त्रातील अभ्यासक्रम चालवला जातो. २००३मध्ये ३ वर्षा मुदतीच्या कार्डिओलॉजीतल्या डीएनबी कार्यक्रमाला देखील म ान्यता मिळालेली आहे. यामधून दरवर्षी कार्डिओलॉजीस्टची दोन पदे मंजूर केली जातात. आजवर या ग्रूपतर्फे गेल्या सात वर्षात ९०,००० रुग्णांना सेवा पुरविण्यात आली आहे. ३०,००० कार्डिओग्राम्स, २५००हून अधिक स्ट्रेस टेस्ट करण्यात आलेल्या आहेत.

आपल्या रुग्णांसाठी सिक्स सिग्मा सेवा पुरविण्यावर रुग्णांलयाचा भर असतो. येथील काही विभागांना यूएस- एफडीएची नोव्हेंबर २००० मध्ये मान्यता मिळालेली आहे. अधिक माहितीसाठी भास्कर - ०२२-२४९३०३५४, ०८३२- ६६९१६०० /६६९१६६६ यांच्याशी संपर्क साधावा.